**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 26.03.2025** **वार- बुधवार**

---

**उष्माघात**

गेल्या काही दिवसांपासून उष्णतेच्या वाढत्या झळांचा परिणाम पाळीव जनावरांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. त्यामुळं पशुपालक त्यांच्यासाठी विविध उपाय करत आहेत. जनावरं खुराक खात नसल्यास त्यांना काही प्रमाणात गूळ चाटायला द्यावा. दूध काढण्यापूर्वी जनावराला थंड पाण्यानं धुवावं. उष्माघात झाल्यास पशुवैद्यकाकडे त्वरित संपर्क करावा असं आवाहन पुणे पशुधन अधिकारी अजय कोल्हे यांनी केलं आहे.

**महावितरण**

महावितरणनं थकबाकी वसूल करण्यासाठी पुणे परिमंडलातील २५ हजार ४३४ थकबाकीदारांचा वीज पुरवठा गेल्या २४ दिवसांत खंडित करण्यात आला आहे. घरगुती, व्यवसायिक आणि औद्योगिक वीजग्राहकांकडे ८८ कोटी ४५ लाख रुपयांची थकबाकी आहे. मुख्य अभियंता राजेंद्र पवार थकबाकी वसुलीचा आढावा घेत आहेत.

**रुपक्वाटंम**

क्वाटंम तंत्रज्ञानाचा भविष्यातील युद्धांवर परिणाम' या विषयावर लष्कराच्या पुण्यातल्या दक्षिणी कमांडद्वारे आज एक परिसंवाद आयोजित करण्यात आला.

त्यामध्ये उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी क्वांटम तंत्रज्ञानाबाबत लष्करासोबत सहयोग करण्याच्या उपायांवर यामध्ये चर्चा केली. क्वांटम कॉम्प्युटींग, क्रिप्टोग्राफी आणि सेन्सिंग यांची आधुनिक युद्धातील विध्वसंक भूमिका विविध तज्ज्ञांनी समजावून सांगितली. दक्षिणी कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी बीजभाषण केलं.

**<u>बनावट</u>**

वाहनांसाठी बंधनकारक उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' म्हणजे HSRP बसविण्यासाठी सायबर गुन्हेगारांकडून बनावट संकेतस्थळावरून फसवणूक केली जात असल्याचं उघडकीस आलं आहे. त्यामुळं 'HSRP' नोंदणी करताना वाहनधारकांनी सावधानता बाळगावी, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे. HSRP नोंदणीसाठी शासनानं transport.maharashtra.gov.in ही अधिकृत वेबसाइट उपलब्ध केली आहे.

दरम्यान, १ एप्रिल २०१९ च्या आधी नोंदणी झालेल्या वाहनांवर एचएसआरपी बसविण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवडच्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**<u>पाणी</u>**

राज्य आरोग्य प्रयोगशाळेनं पुण्यात यावर्षी २१ जानेवारी ते १३ मार्च या कालावधीत पाण्याच्या ३१२ नमुन्यांची तपासणी केली.
त्यातील ७९ पाणी नमुने दूषित आढळले असून, ते पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष काढला आहे. पुण्यातील नांदेडगाव परिसरात जीबीएसचा प्रादुर्भाव सुरु झाल्यामुळं खडकवासला परिसरातील सर्वाधिक नमुने होते असं राज्य आरोग्य प्रयोगशाळेचे उपसंचालक विनोद फाळे यांनी सांगितलं.

**बक्षीस**

राज्य सरकारच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानामध्ये पुणे महापालिकेच्या IWMS प्रणालीला द्वितीय क्रमांकाचं सहा लाख रुपयांचं पारितोषिक आज जाहीर झालं आहे. या प्रणालीमुळे पूर्वगणन पत्रक ते अंतिम बिलापर्यंतची सर्व कामं ऑनलाईन करण्यात येतात.

**शिष्यवृत्ती**

राज्य, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या 344 खेळाडूंना पुणे महापालिकेकडून शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. वेगवेगळ्या १० गटांसाठी ८७ लाख १० हजार रुपये शिष्यवृत्ती खर्च करण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीनं मान्यता दिली आहे.

**निरीक्षक**

वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या किंवा घेत असलेल्या विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इतर रुग्णालयात निरीक्षक म्हणून कामकाज करण्यासाठी संधी देण्यात येणार आहे. प्रशिक्षणाची परवानगी मिळाल्यानंतर महापालिकेशी करार करावा लागणार असून याविषयीची अधिक माहिती पालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**शेट्टी**

वर्तमान वर्षात उसाच्या एफआरपी म्हणजे रास्त आणि किफायतशीर किंमतीपोटी शेतकऱ्यांचे दोन हजार 300 कोटी रुपये थकीत असल्याची माहिती अर्धवट असून, ही रक्कम सात हजार कोटी रुपये असल्याचं स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे. साखर आयुक्तालयानं आठ दिवसांत शेतकऱ्यांना ही रक्कम द्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

**पुप**

चिंचवड स्टेशन आणि चिंचवड गाव यांना जोडणारा लोहमार्गाजवळील पुलाचा काही भाग कोसळला असून हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. या पुलाजवळील असणाऱ्या पुलावरून गावाकडं जाणारी वाहतूक वळवण्यात आली असून जड वाहनांना बंदी करण्यात आली आहे. दुरुस्तीचं काम युद्ध पातळीवर सुरू असल्याची माहिती महापालिका कार्यकारी अभियंता प्रेरणा सिनकर यांनी दिली.

**<u>मानसिक</u>**

मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंधाच्या विषयात काम करणाऱ्या पुण्यातील कनेक्टिंग ट्रस्ट ह्या संस्थेनं या महिन्यात समाजसेविका आणि महिला काळजीवाहकांसाठी आयोजित केलेल्या listening circles या अभियानाचा समारोप २९ मार्चला कॅम्प परिसरातील अरोरा टॉवर्स इथं होणार आहे. विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेल्या महिला तसंच तृतीयपंथी आपली मतं आणि विचार यामध्ये मांडणार आहेत.

**<u>फुटबॉल</u>**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेतर्फे 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या प्रथम आणि व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात न्यु इंडिया सॉकर क्लब, डेक्कन इलेव्हन, खडकी ब्ल्युज् स्पोटर्स असोसिएशन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**